भाग ७

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

॥ श्री ॥

।। चिंतनक्षण ।।

भाग : ७

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-७ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

सर्वसाधारण मानवी क्षमता व कार्ये यांच्या उत्तमात उत्तम संतुलित व्यवस्थापनाचे शास्त्र म्हणजे भक्ती होय.१८१

संतांनी भगवंताची प्राप्ती कशी करून घेतली हे त्यांच्या चरित्रांतून कळले,तरी आपण ती कशी करून घ्यावी, हे त्यांच्या उपदेशातून कळते.१८२

उन्नतीने समाधान होत नाही, याचे कारण उन्नतीचे प्रयत्न चुकीचे नसून उन्नतीविषयीच्या कल्पना चुकीच्या असतात हे आहे. १८३

परमार्थाच्या कुलुपाच्या अनेक किल्ल्या आहेत,पण सर्व किल्ल्यांतली अडचण एकच आहे की, कुठलीही किल्ली प्रत्यक्ष वापरल्याशिवाय कुलूप उघडत नाही.१८४

नाम हा शब्द किंवा संकेत न
वाटता भगवंतच वाटू लागला
म्हणजे आपली नामातली
प्रगती झाली म्हणायचे. १८५

आजार, अपयश, मनाविरुद्ध
गोष्ट - ही स्वतःपुरती तरी
आपला अहंकार ओलांडण्याची
एक परीने अनायासे आलेली
संधी होय.१८६

खऱ्या आनंदाची कल्पना नाही तोपर्यंतच करमणुकी, मनोरंजने व कृत्रिम आनंदाची चलती आहे.[१८७]

गरजा बेसावधपणे व
अकारण वाढवण्यात आपण
भगवंतापासून दूर जाण्याचे
बीज व धोका आहे.१८८

अनेक महान ग्रंथ व संत यांचे
बरेचसे श्रम आपल्याला खरा
श्रोता बनवण्यात खर्ची पडलेले
आहेत. १८९

सध्या कुरुक्षेत्रे सोडून
अन्य सर्वत्र
गीतेचा सुकाळ आहे.[१९०]

आपले तोंड देवाकडे नसले
म्हणजे देवाचे तोंड कुठे
करावे अशा गोष्टींची चिंता
जरा जास्त लागते.१९१

संतांचे सर्वांवरच प्रेम असले तरी दोन
लोकांच्यावर त्यांचे विशेष प्रेम
दिसते- एक त्यांचे 'अंतर'
जाणणारे व दुसरे त्यांच्यापासूनचे
आपले 'अंतर' जाणणारे ! १९२

स्वार्थ व अहंकार यांनी
कळतनकळत प्रतिक्षणी होणाऱ्या
अशुद्धीचे प्रायश्चित्त ही आपली
किमान दैनंदिन उपासना होय.१९३

उघड्या, अनुत्सुक व नापीक
माळाला कुंपणाची व राखणीची
गरज नसते, म्हणून काहींना
गुरूंचा सहवास वा रक्षण नसते.१९४

अपरिमित स्वार्थाच्या तत्त्वज्ञानाने माणुसकीचा दुष्काळ आणला आहे.[१९५]

भगवंताची वा सद्गुरूंची लीला म्हणजे आपल्या लक्षात येईपर्यंत सांगत राहाण्याची व्यवस्था नव्हे, ती सावधांसाठी सूचकतेची चमकून जाणारी वीज आहे.१९६

भगवंत सर्वव्यापी असूनही माणूस
भगवंतापासून अलग राहू शकतो
याचे भगवंतालाच आश्चर्य,
जिज्ञासा व दुःख आहे.१९७

अनेक लोक
‘देवळांना’ जातात,
काहीच ‘देवांना’ !१९८

एकंदरीत माणसाला 'स्व'शिवाय त्राता नाही - प्रपंचात स्व 'गिरवल्याशिवाय नाही' व परमार्थात स्व 'पुसल्याशिवाय नाही' ! १९९

मृत्यू म्हणजे मुक्ती नव्हे ! २००

ज्यांना सहीपुरते लिहिणेही कठीण
जाते अशी नवी निरक्षर पिढी
संगणककृपेमुळे आकाराला
येण्यातला धोका वेळीच
ओळखण्यासारखा आहे. २०१

अनेक जण अनुग्रहानंतर
साधनेला लागतात ! खरे तर
खऱ्या अनुग्रहासाठी खडतर
साधनेची गरज आहे.[२०२]

जीवनाच्या उच्चतम अवस्थेत
नित्य राहाता यावे म्हणून
करायची तयारी म्हणजे
साधना होय.[२०३]

वेदनांच्या घंटा
वाजत असल्या म्हणजेच
काहींच्या देहातला देव
जागा राहातो ! २०४

आपले प्रपंचाचे तथाकथित भरलेले
ताट न हालवता त्याभोवती
परमार्थदृष्टीची सुंदर रांगोळी काढून
आनंदीआनंद निर्माण करणारे श्री
गुरू किती दयाळू असतील !२०५

आचरणावरून गुरूंचे नाव न कळल्याने, ते सांगण्याची वेळ येणे शिष्यत्वाला कमीपणाचे वाटावे.[२०६]

माणसाला स्वार्थाला आयुष्यभर वकील लागत नाही व परमार्थात मात्र गुरूशिवाय एक पाऊल पुढे पडत नाही ही वस्तुस्थिती की सबब ?२०७

जागी बसून मार्गातल्या
शंका विचारण्यापेक्षा
चालताचालता येणाऱ्या
शंका विचारणे बरे !

लोभ व संचयाविरुद्धच्या लढाईत,
आपले दान स्वीकारणारा हा,
आपला 'कृतिशील मित्र' आहे.२०९

कळते ते वळावे म्हणून
कमी पडणारी शक्ती
मिळवणे म्हणजे
उपासना होय.[२१०]

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *